# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा आराखडा केंद्राकडे पाठविण्यात आल्याबाबत**

**(१) २८५४ (१५-०१-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत २ हजार २५७ कोटी रुपयांचा आराखडा केंद्राकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखड्यात ४०० कोटी रुपयांची कपात करुन केंद्राचे १ हजार ८५७ कोटी रुपयांचा आराखडा माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधीत केंद्राने कपात करण्याची कोणती कारणे राज्य शासनाला कळविली आहेत व कपात केलेला निधी राज्य शासनाने सदर योजनेसाठी दिला आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (११-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी एकूण २ हजार ९३० कोटी रुपये केंद्र शासनाकडे २०१४-१५ करिता प्रस्तावित केला होता.

(२) हे खरे नाही.

सन २०१४-१५ साली केंद्रशासनाचा महाराष्ट्र राज्यासाठी Resource Envelope २ हजार ६० कोटी इतका होता. परंतु, केंद्रशासनाकडून एकूण २ हजार ३१४ कोटींच्या आराखडा मंजूर होऊन आला त्यामुळे ४०० कोटी रुपयांची कपात झाल्याचे खरे नाही.

(३) केंद्र शासनाने निधीची कपात केलेली नसल्यामुळे कारणे कळविण्याला प्रश्नच उद्भवत नाही.

(४) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, राष्ट्रीय रोगनियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय असंसर्गजन्य नियत्रण कार्यक्रम राज्यात योग्य प्रकारे राबविण्यात येत आहेत.

---

**लातूर जिल्हयातील एकाही शेततळ्याला मंजूरी मिळाली नसल्याबाबत**

**(२) ३११८३ (१५-०१-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमाअंतर्गत मागेल त्याला शेततळे देण्याची योजना असूनही लातूर जिल्हयात या घोषणेनंतर एकाही शेततळयाला मंजूरी मिळाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन निकषात अडकलेल्या शेततळयाच्या योजनेसाठी शेतकऱ्यांकडून अर्ज येत नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांचीही अडचण होत असून राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमांतर्गत देण्यात येणाऱ्या शेततळयांच्या योजनेचा निकष बदलावा अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लघु पाटबंधारे स्थानिक स्तर जालना यांचे मार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात परभणी व जालना जिल्हयातील कामात झालेला गैरव्यवहार**

**(३) ३८४४९ (२०-०१-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघु पाटबंधारे स्थानिक स्तर जालना यांचे मार्फत परभणी व जालना जिल्हयात सन २०११ ते २०१५ या कालावधीत सर्वेक्षणाची कामे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत संबंधीतांना किती रक्कम अदा करण्यात आलेली आहे,

(३) असल्यास, सर्वेक्षणाची कामे मजुर सहकारी संस्थाना देण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संगनमताने चुकीच्या पध्दतीने कामे देवून शासनाची रक्कम अपहार करणाऱ्या अधिकारी व मजुर सहकारी संस्थेच्या विरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१५-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीत प्रस्तावित योजनेंच्या सर्वेक्षणासाठी संबंधितांना रू. १००२.३५ लक्ष रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.
सदर सर्वेक्षणाची कामे जलद गतीने पुर्ण करण्याच्या दृष्टिने काही कामे सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना व काही कामे मजुर सहकारी संस्थांना, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना/ परभणी यांच्या शिफारस पत्रानुसार बी-१ निविदेवर देण्यात आली आहे. मजुर सहकारी संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणाच्या व अंदाजपत्रके तयार करण्याच्या कामामध्ये तांत्रिक गुणवत्तेची कमतरता आढळून आलेली नाही. त्यामुळे सदर कामे वाटपामध्ये कोणतीही चुकीची पद्धत अवलंबित करून शासनाच्या रक्कमेचा अपहार झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची अंमलबजावणी अपुऱ्या मनुष्यबळामुळे होत नसल्याबाबत.**

**(४) ३९९८४ (१०-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००६-०७ साली राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु झाल्यापासून शासनाकडून दरवर्षी रुग्ण-कल्याण, लोकहित समोर ठेवून वेगवेगळ्या योजना राबविण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी करोडो रुपये मंजूर होतात तथापि स्थानिक पातळीवरील आरोग्याशी संबंधित असलेल्या खात्यामध्ये समन्वयाचा अभाव व अपुरे मनुष्यबळ असल्यामुळे यातील बरेचसे पैसे योजनेतील शेवटच्या लाभार्थीपर्यंत लाभ पोहचण्याच्या आधीच परत जात असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान होते तर लाभार्थींना पुरेसा लाभ मिळत नाही, परिणामी शासनाने योजनेच्या अंमलबजावणीकरिता गुंतवलेले रुपये वाया जात आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (११-०१-२०१८) :** (१) होय, खरे आहे.

सन २००६-०७ साली राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरू झाल्यापासून वार्षिक मंजूर आराखड्यानुसार रूग्ण कल्याण व लोकहिताकरीता आरोग्य योजना राबविण्यात येतात.

त्यात प्रमुख्याने माता व बाल संगोपन कार्यक्रमातर्गत जननी सुरक्षा योजना, नियमीत लसीकरण, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, राष्ट्रीय बाल स्थास्थ कार्यक्रम, किशोरी स्वास्थ कार्यक्रम, जननी शिशू सुरक्षा व रूग्ण कल्याण समित्याअंतर्गत रूग्णांकरीता आवश्यक असलेल्या सेवा येतात.

(२) हे खरे नाही.
केंद्र शासनाकडुन वार्षिक मंजूर प्रकल्प आराखड्यास अनुसरून राज्य आरोग्य सोसायटीस प्राप्त होणारा निधी जिल्हास्तरावर वर्ग केल्यानंतर जिल्हास्तरावरून पुढे तालुक्यामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रस्तरावर तसेच जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयामार्फत उपजिल्हा रूग्णालय / ग्रामीण रूग्णलय / स्त्री रूग्णालयापर्यंत निधी वितरीत होत असतो. या गावपातळीवरील आरोग्य संस्थामार्फत रूग्णांना थेट सेवा दिली जाते.

अभियानांतर्गत प्राप्त होणारा निधी हा वित्तीय वर्ष अखेर काही प्रमाणात शिल्लक राहीला तरी तो व्यपगत होत नाही व पुढील आर्थिक वर्षाकरीता बँकेच्या खाती शिल्लक राहतो. पुढील आर्थिक वर्षाच्या वार्षीक प्रकल्प आराखड्यानुसार सुरवातीची शिल्लक व नव्याने प्राप्त होणारा निधी अशा एकुण उपलब्ध प्राप्त निधीचे विनीयोजन रूग्णसेवेसाठी केले जाते. स्थानिक पातळीवरील आरोग्याशी संबंधित खात्यामध्ये योग्य समन्वय राखला जात असून त्याअभावी निधी परत जात असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

तसेच योजनानिहाय लाभार्थ्यांना देण्यात येणारा लाभ त्यांच्या बँकेच्या खाती थेट जमा केला जातो.

अभियानांतर्गत निधी व्यपगत होत नसल्याने हा निधी कधीच परत जात नाही. तसेच माहे नोव्हें. २०१५ मध्ये देखील निधी परत गेलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील मांजरी बुद्रूक, साडेतसरानळी, केशवनगर या गावांमधील जिल्हा परिषद शाळेच्या अंगणवाडीतील मुलांना शालेय पुरक पोषण आहार मिळत नसल्याबाबत**

**(५) ५५६२७ (२६-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील मांजरी बुद्रूक, साडेतसरानळी, केशवनगर या गावांमधील जिल्हा परिषद शाळेच्या अंगणवाडीतील मुलांना गत एक महिना शालेय पुरक पोषण आहार मिळाला नसल्यामुळे कुपोषित बालकांना सुदृढ करण्याबाबतची शासनाची योजना राबविली गेली नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरील शाळेत अंगणवाडी पर्यवेक्षिका नसल्याने एका महिन्यापासून २८ अंगणवाडया पोषण आहारापासून वंचित राहिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी असलेल्या संबंधितावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-१२-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात अनुसूचित जातीमध्ये अल्पवयात विवाह करण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(६) ५७०१८ (२०-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनुसूचित जातीमध्ये अल्पवयात विवाह करण्याचे प्रमाण लक्षणीय वाढल्याने सन २०११ च्या जनगणनेत स्पष्ट झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सन २०११ च्या जनगनेच्या आकडेवारीनुसार १४ वर्षापर्यंत २३,७५६ मुलींचा विवाह झाला असून यातील १३८९ मुलींना याच वयामध्ये वैधव्य आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे बालविवाह रोखण्याकरिता कोणत्या अडचणी शासनास येत आहे,
(४) असल्यास, या अडचणीवर मात करण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत वा आखत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) तथापि, बालविवाह रोखण्यासाठी शासन अधिसूचना दि.०३ जून, २०१३ अन्वये ग्रामिण भागात ग्रामसेवक यांना त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून व संबंधीत ग्राम पंचायत क्षेत्रातील अंगणवाडी सेविका, या बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास सहाय्य करतील अशी नियुक्ती केली आहे. तसेच नागरी भागासाठी शासन अधिसूचना दि.१८ ऑगस्ट, २०१६ अन्वये बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना आपापल्या संबंधित प्रकल्प क्षेत्रावर अधिकारीता असणारे बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणुन नियुक्ती केली आहे, आणि बाल विवाह प्रतिबंधक अधिका-याला सहाय्य करण्याकरिता संबंधित बालविकास प्रकल्प (नागरी) या अंतर्गत नेमलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिकांची नियुक्ती केली आहे. तसेच ग्रामस्तरावर ग्रामसभा आयोजित करुन जनजागृती करण्यात येते व शहरी व ग्रामीण भागामध्ये मुख्यसेविका, अंगणवाडी सेविका तसेच मदतनिस यांच्या मार्फत बालविवाह आणि शिक्षणाबाबत नियमितपणे प्रचार व प्रसिध्दी करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शासकीय रुग्णालयात औषधांची मोठ्या प्रमाणावर अनियंत्रित खरेदी आणि असमान वाटप होत असल्याबाबत

**(७) ५८०३७ (३०-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अनेक दिवसापासून शासकीय रुग्णालयासाठी औषधांची मोठ्या प्रमाणावर अनियंत्रित खरेदी आणि असमान वाटप होत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, नंदुरबार जिल्हयातील दुर्गम भागातील आरोग्य केंद्रामध्ये लहान मुलांना देण्यात येणाऱ्या सिरप, पॅरासिटीमल गोळ्यांचा देखील तुटवडा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या औषध खरेदी प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, नंदूरबार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात लहान मुलांसाठी आवश्यक औषधांचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०८-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) सद्यस्थितीत जिल्हा स्तरावर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर औषधांचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्हयात कुष्ठरोग निवारणार्थ व कुपोषण निवारण्याकरिता देण्यात आलेला निधी खर्च न झाल्याबाबत

**(८) ६१४५९ (३०-०८-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयात जिल्हा नियोजन समितीने आरोग्य विभागाला कुष्ठरोग निवारणार्थ व कुपोषण निवारण्याकरिता १८ लाखांचा निधी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान उपलब्ध करून दिला असता हा निधी खर्च न केल्याने परत गेल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरचा निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, हा निधी खर्च न करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०१-२०१८) :**(१) होय, अंशतः खरे आहे.
कुष्ठरोगासाठी निधी उपलब्ध झालेला नसून फक्त कुपोषण निवारण्याकरीता व्हीसीडीसी साठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या दिनांक १९/३/२०१६ च्या आदेशान्वये रु.१८ लक्ष अनुदान आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जळगाव या कार्यालयाकडे वितरीत करण्यात आले होते.

(२) कोषागारातून बीडीएसद्वारे दि.३१/३/२०१६ चे आत आहरित केले गेले नाही.
(३) संबंधित जबाबदार / वरिष्ठ सहाय्यक यांना दिनांक २१/६/२०१६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात येऊन विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोदिया जिल्ह्यातील मामा तलावांची दुरुस्ती, नुतनीकरण व खोलीकरण करण्याचा निर्णय**

**(९) ६३६५६ (२४-०८-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोदिया जिल्ह्यातील सुमारे ६ हजार मामा तलावांची दुरुस्ती, नुतनीकरण व खोलीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याच माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मामा तलावांमध्ये मत्स्यसंवर्धन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील तलाव मच्छिमारी सोसायट्यांना व्यवसायासाठी देण्यात आले आहे काय,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाचे कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०५-०१-२०१८) :** (१), (२) व (३) होय.
जलसंधारण विभागाच्या दि. १६ मे, २०१६ च्या शासन निर्णयान्वये पुर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील चेंबूर येथील बेघर व भिकाऱ्यांच्या निवाऱ्यातील गैरव्यवहाराबाबत**

**(१०) ६७२५१ (१६-०१-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चेंबूर येथील बेघर व भिकाऱ्यांच्या निवाऱ्यासाठी सुमारे २८ एकर १ लाख १२ हजार ९२४ चौ.मीटर सरकारी जमिनीवरील सुमारे २५०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी चौकशीसाठी शासनाने माहे ऑगस्ट, २०१६ च्या दरम्यान त्रिसदस्यीय समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने चौकशी पुर्ण केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औषध खरेदी महामंडळ स्थापण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(११) ६७३९० (१६-१२-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औषध खरेदी महामंडळ स्थापन करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच टाटा ट्रस्टच्या माध्यमातून या महामंडळाची निर्मिती करणारा सामंजस्य करारही करण्यात आला व या महामंडळाच्या उभारणीसाठी येणारा ४५ कोटी रूपये खर्च करण्याचा टाटा ट्रस्टने मान्य केल्यानंतर महामंडळ निर्मितीचा प्रस्ताव करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू औषध खरेदी महामंडळाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, औषध खरेदी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय होवून आजमितीस ९ महिन्यांहून अधिक कालावधी लोटला असतानाही अद्यापी सदरहू निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०८-०१-२०१८) :** (१) सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांसाठी औषधे, तदअनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे इत्यादी बाबींची खरेदी व वितरण हाफकिन बायो- फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. या महामंडळाकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून त्याबाबत दिनांक २६.०७.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.

राज्यातील आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी टाटा ट्रस्ट यांच्यासमवेत दिनांक ३१.०३.२०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला होता. सदर करारातील तरतूदीनुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या खरेदी/वितरण धोरणाचा अभ्यास करुन महाराष्ट्र स्टेट मेडिकल सप्लाय कार्पोरेशन स्थापन करण्याच्या दृष्टीने टाटा ट्रस्ट यांनी अहवाल सादर करावयाचा होता.

तथापि, सदर महामंडळाच्या उभारणीसाठी येणारा खर्च टाटा ट्रस्ट तर्फे करण्यात येणार नव्हता.
(३) राज्यातील आरोग्य संस्थांसाठी खरेदी करावयाच्या औषधे, तदअनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे इत्यादी बाबींच्या दरातील तफावत दुर करणे तसेच खरेदी प्रक्रियेत

एकसुत्रता आणणे यासाठी राज्य शासनाच्या विविध विभागांना लागणाऱ्या औषधे, तदअनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे इत्यादी बाबींची खरेदी हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. यांच्याकडून करण्यात येणार आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलूर व बिलोली (जि. नांदेड) तालुक्यातील सिंचन तलाव, पाझर तलाव, व मालगुजारी तलावांच्या दुरूस्तीच्या कामांची अंदाजपत्रके तयार करून शासनाकडे सादर करण्याबाबत**

**(१२) ७०५४७ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील नादुरूस्त असलेल्या सिंचन तलाव, पाझर तलाव व मालगुजारी तलाव इ. दुरूस्तीच्या कामांची अंदाजपत्रके तयार करून शासनाकडे सादर करण्याबाबत मा.जलसंधारण मंत्री, राज्यमंत्री यांनी कार्यकारी अभियंता (ल.पा.) जिल्हा परिषद, नांदेड यांना दिनांक २५ मे, २०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामांची अंदाजपत्रके शासनाकडे प्राप्त झाली आहेत काय,
(३) असल्यास, सदर कामांच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०४-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) देगलूर व बिलोली तालुक्यात दुरूस्ती योग्य असे एकुण ३२ माजी मालगुजारी तलाव आहेत. या तलावांच्या दुरूस्तीची अंदाजपत्रके तयार करण्यासाठी तलावाच्या तांत्रिक बाबींची माहिती आवश्यक आहे. परंतु सदरील माजी मालगुजारी तलाव हे निजाम कालीन असल्याने तलावाचे तांत्रिक अभिलेखे उपलब्ध नाहीत. यास्तव सर्व माजी मालगुजारी तलावांचे सविस्तर सर्वेक्षण करून तलावाचे चित्रलेखन व अनुषंगिक तांत्रिक बाबींची माहिती घेणे आवश्यक आहे. यासाठी सर्वेक्षणासाठी आवश्यक निधीची मागणी जिल्हा नियोजन समिती, नांदेड कार्यालयाकडे प्रगतीपथावर आहे.

देगलूर व बिलोली तालुक्यातील दुरूस्ती योग्य सिंचन व पाझर तलाव दुरूस्तीची अंदाजपत्रके तयार करून प्रस्तुत कामे जलयुक्त शिवार अभियानामधून पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

तसेच लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडील अपुऱ्या कर्मचारीवृंदामुळे विषयांकित माजी मालगुजारी तलावांचे दुरूस्ती कामांचे अंदाजपत्रके लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, नांदेड यांचेकडून ठेव तत्वावर करून घेण्याचे नियोजन आहे.

---

**नांदेड येथील कै.डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरीकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त सीटीस्कॅन मशीन बंद पडल्याबाबत**

**(१३) ७०७७० (१०-०१-२०१७). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील कै.डॉ.शंकरराव चव्हाण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरीकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त सीटीस्कॅन सुविधेचे दिनांक १ जून, २०१६ रोजी केंदीय आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री यांच्याहस्ते व राज्याचे आरोग्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली लोकार्पण सोहळा पार पडला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात लोकार्पण केलेली सहा कोटी रुपयांची सीटीस्कॅन मशीन तीस दिवसातच बंद पडल्याने रुग्णांची हाल होत असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोटी रुपये खर्च करुन आणलेली मशीन महिन्यातच बंद पडण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-१२-२०१७) :** (१) हे खरे आहे.

सदरील यंत्राचा लोकापर्ण सोहळा दिनांक १५ जून २०१६ रोजी संपन्न झालेला आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदरील यंत्र कार्यान्वित झाल्यानंतर तांत्रिक बिघाडामुळे नादुरुस्त होते. तथापि दरम्यानच्या काळामध्ये रुग्णांच्या चाचण्याकरीता पर्यायी व्यवस्था केली होती. सद्य:स्थितीत १२८ स्लाईस सी.टी.स्कॅन यंत्र सुस्थितीत कार्यरत असून त्यावर रुग्णांच्या तपासण्या करण्यात येत आहेत.

(४) व (५) याविषयी अधिष्ठाता,ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या. चौकशी अहवाल प्राप्त झाला असून सदर प्रकरणी अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द शिस्तभंगाविषय कारवाई करणेबाबत दोषारोपांचे जोडपत्रासह प्रस्ताव सादर करण्याच्या संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रस्ताव प्राप्त होताच संबंधितांवर शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

**राज्यात बाल न्याय कायद्यानुसार स्थापित समित्यांची मुदत संपल्याबाबत**

**(१४) ७४१२८ (१५-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बाल न्याय कायद्यानुसार प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचे मुदत संपल्यामुळे कार्य थांबविण्यात सांगण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वीच्या समित्यांचे मुदत संपल्यामुळे समितीचे पुर्नस्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१८) :** (१) नाही.

(२) राज्यातील ज्या बाल कल्याण समित्यांची मुदत संपलेली आहे, अशा बाल कल्याण समित्यांवर कार्यरत सदस्यांनी नवीन सदस्यांची नियुक्ती होईपर्यंत अथवा शासनाच्या पुढील आदेशापर्यंत कामकाज पहावे, असे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेची कामे जाहीरात न देता संबंधित ठेकेदारांना दिल्याबाबत**

**(१५) ७४५६८ (१९-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेची कामे जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाने जाहीरात न देता परस्पर निविदा प्रक्रिया राबवुन सबंधित ठेकेदारांना कामे दिल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ई निविदा प्रक्रियेचा फार्स दाखवुन जि.प.ल.पा. विभागाने संबंधित ठेकेदारांनाच कामे दिल्याची तक्रार देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तक्रारीची दखल घेऊन शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) जि.प.ल.पा. (पश्चिम विभाग) जि.प.नाशिक यांनी वर्तमान पत्रात जाहीरात न देता परस्पर निविदा प्रसिद्ध केली होती. तथापि, सदर बाब लक्षात आले नंतर सदर ई-निविदा प्रक्रिया रद्द करून वर्तमानपत्रात जाहीरात देऊन पुनश्च ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

या बाबींस जबाबदार धरून कार्यकारी अभियंता ल.पा.(पश्चिम विभाग) जि.प.नाशिक यांचेविरूद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने दोषारोपपत्र बजावण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सार्सी (ता.नांदगाव, जि.अमरावती) येथील पाझर तलावाकरिता संपादीत जमिनीचा मोबदला मिळणेबाबत**

**(१६) ८०३१२ (१८-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सार्सी (ता.नांदगाव, जि.अमरावती) येथील पाझर तलावाकरिता संपादीत जमिनीचा मोबदला अद्यापपर्यंत निधीअभावी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी मागणीकरीता काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-०१-२०१८) :** (१) होय.

(२) शासन निर्णय दिनांक १३/९/२०१७ अन्वये विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत पुर्ण झालेल्या व अपुर्णावस्थेत असलेल्या प्रकल्पांचे प्रलंबित दायित्व विभागाच्या अन्य योजनांमधून पूर्ण करण्याकरीता वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दत्तक विधानाची नवीन नियमावलीबाबत**

**(१७) ८०३६७ (१९-०४-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दत्तक विधानाचा दर ४०% अधिक प्रमाणात घटत चालल्याने शासन दत्तक विधानाची नवीन नियमावली तयार करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दत्तक विधानाचा दर वाढविण्यासाठी राज्य नियमावलीत कोणते नियम केले आहेत,

(३) असल्यास, स्थानिक स्वयंसेवी संस्थांचा थेट सहभाग वाढवला आहे काय,

(४) असल्यास, दत्तक प्रक्रिया ऑनलाईन करतांना राज्य दत्तक विधान सल्लागार समितीत राज्यातील प्रत्यक्ष या कार्यक्षेत्रात काम करण्याचा अनुभव असलेल्या विशेषत: बालहक्क विशेष तज्ञांचा या समितीत समावेश केला वा करण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१८) :** (१) नाही.

कारा (CARA), नवी दिल्ली ही संस्था दत्तक प्रक्रियेमध्ये काम करणारी सर्वोच्च केंद्रीय संस्था असून त्यांचे मार्फत दत्तकविधान नियम (Adoption Regulations) १६ जानेवारी, २०१७ अन्वये अधिसूचित करण्यात आलेले आहेत. सदरील नियमांचे पालन करणे राज्यातील सर्व संस्थांना बंधनकारक आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील आदिवासी परीक्षेत्रातील सावळद, खरोडी व तरोडी या पाझर तलावाच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(१८) ८२१११७ (१८-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील आदिवासी परीक्षेत्रातील सावळद १,२,३,४,५ तसेच खरोडी २,३ व तरोडी या पाझर तलावाच्या कामांना मान्यता देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाझर तलावाची सिंचन क्षमता ५० हेक्टरचे जवळपास असुन हे प्रकल्प तांत्रिकदृष्टया सफल आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा. राज्यपालांनी निर्धारीत केलेल्या सिचंनाच्या अनुशेषाअंतर्गत वाशिम जिल्हा आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलसंधारण विकास महामंडळ, औरंगांबाद यांचेमार्फत सदर पाझर तलावाच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-०१-२०१८) :** (१), (२) व (३) होय.
(४) सदरहू योजना शासन निर्णय दिनांक १९/०७/२०१६ नुसार आर्थिक मापदंडात असफल आढळतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात राजीव गांधी जीवनदायी योजनेचे नाव बदलण्याचा प्रस्ताव

**(१९) ८४८२४ (११-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या राजीव गांधी योजनेचे नाव व स्वरूप बदलण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु योजनेस नव्याने देण्यात येणारे नाव काय आहे आणि बदलण्यात येत असलेल्या स्वरुपाची थोडक्यात रूपरेषा काय आहे,
(३) असल्यास, सदर योजनेत नवीन कोणत्या आजारावरील उपचारांचा खर्च देय करण्यात आला आहे वा कोणत्या आजारावरील उपचारांचा खर्च वगळण्यात आला आहे,
(४) असल्यास, राज्यात स्वरूप व नाव बदललेल्या नवीन योजनेची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१३-१२-२०१७) :** (१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या स्वरूप व व्याप्तीमध्ये बदल करून सुधारित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबविण्याचा निर्णय दिनांक ७ जून, २०१६ च्या मंत्रिमंडळ बैठकीत शासनाने घेतला आहे. तसेच सदर योजना राबविण्यास दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये वार्षिक विमा संरक्षण मर्यादा रू. २ लक्ष, मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी दात्याच्या शस्त्रक्रियेच्या समावेशासह विमा संरक्षण मर्यादा रू.३ लक्ष अशी आहे. लाभार्थी कुटंबाना ३१ विशेष सेवांतर्गत ११०० उपचार विमा संरक्षणाद्वारे उपलब्ध होणार असून यातील १२७ उपचारांकरीता पाठपुरावा सेवा आहे तर १११ उपचार शासकीय रूग्णालयांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सदर योजनेमध्ये शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमातील महिला, शासकीय अनाथालयातील मुले, शासकीय वृध्दाश्रमातील जेष्ठ नागरिक तसेच अधिस्विकृती पत्रकार व त्यांचेवर अवलंबून असणारे कुटुंब या लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.
(३) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये विद्यमान ९७१ उपचारांपैकी १२१ उपचार वगळण्यात आले असून २५० उपचार वाढविण्यात आले आहेत. यामध्ये कर्करोग, बालक यावरील काही नवीन उपचार Hip and Knee Replacement, सिकलसेल, ॲनिमिया, इ. आजारावरील उपचारांचा समावेश करण्यात आला आहे. अशाप्रकारे सदर योजनेमध्ये लाभार्थी कुटुंबाना ३१ विशेष सेवांतर्गत ११०० उपचार विमा संरक्षणाद्वारे उपलब्ध होणार आहेत.
(४) सुधारित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबविण्याबाबत प्रशासकीय कार्यवाही प्रगतीत आहे. सद्यस्थितीत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील मूळ तरतूदी कायम ठेवून सदर योजना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या नावाने राबविण्यात येत आहे.

---

### राज्यातील अंगणवाडीतील योजना विद्यार्थ्यांच्या आधारकार्डशी जोडण्याबाबत

**(२०) ८५७१८ (१६-०८-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्यांमध्ये मुलांची खोटी संख्या दाखवून अनुदानाचे अपहार केल्यामुळे मा.मुख्यमंत्री यांनी अंगणवाडीतील पूरक पोषक आहार, आरोग्य व अन्य योजना तेथील मुलांच्या आधारकार्डशी जोडून देण्याची सूचना संबंधित विभागांना दिल्या असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याचबरोबर आदिवासी विभागातील मुलांचे कुपोषण कमी करणे, बालमृत्यू रोखणे, साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव होऊ न देणे, यासाठी तातडीने उपयोजना करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात संबंधित विभागाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व थोडक्यात त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-१२-२०१७) :** (१) नाही.

तथापि, केंद्र शासनाचे राजपत्र दिनांक ६ फेब्रुवारी, २०१७ नुसार माहे एप्रिल, २०१८ नंतर आधारकार्डधारक अथवा आधारकार्ड नोंदणीची पावती असणाऱ्या लाभार्थ्यांना आहार पुरवठा करावा असे आदेश आहेत.

(२) व (३) होय.

कुपोषणाला आळा घालण्याच्या दृष्टीने एकात्मिक सेवा योजनेंतर्गत अंगणवाड्यातील ०-६ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना पुरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, अनौपचारीक पूर्व शालेय शिक्षण, लसीकरण आणि आहार व आरोगय इत्यादि सेवा नियमित देण्याच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील परळ येथील जगप्रसिध्द हाफकिन संशोधन संस्थेला राज्य शासनाकडून देण्यात येत असलेल्या निधीबाबत

**(२१) ८५८४३ (१९-०८-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ येथील 'हाफकिन संशोधन संस्थेला' शासनाकडून संशोधनासाठी कोणतीही ठोस मदत मिळत नसल्यामुळे संस्थेत छोटेमोठे संशोधन व काही किरकोळ चाचण्या वगळता कोणतेही संशोधन होऊ शकले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून हाफकिनला एकूण १ कोटी ९० लाख रुपये दिले जात असून त्यातील ९० लाख रुपये एवढी रक्कम केवळ संशोधनासाठी कागदोपत्री दाखविण्यात येत असले तरी प्रत्यक्षात मात्र तेवढीही रक्कम मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधीअभावी संस्था एकही पेटंट घेऊ शकली नसून संशोधकाच्या एकूण पदांपैकी जवळपास ६० टक्के पदेही भरण्यात आली नसल्याची निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या जागतिक कीर्तीच्या संशोधन संस्थेला चालना देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-१२-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) हाफकिन संस्थेस सन २०१६-१७ मध्ये करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून योजनांतर्गत रु.०१.५० कोटी पैकी रु.०१.१६ कोटी आणि योजनेत्तर बाबीकरीता रु.०१.०० कोटी पैकी रु.९०.०० लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे. सदर रक्कम संशोधन व इतर प्रयोगशालेय वापरासाठी करण्यात आली आहे.
(३) शासनाकडून प्राप्त निधीतून संस्था संशोधन करीत असून त्यातून नोंद पात्र निष्कर्ष आल्यास पेटंट घेण्याची हाफकिन संस्थेमार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे. संस्थेतील संशोधकांची पदे भरण्यासाठी वेळोवेळी जाहिरात देऊनसुध्दा उमेदवार प्राप्त झाले नाहीत. सदर पदे भरण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) हाफकिन संस्थेचा दर्जा उन्नत करण्यासाठी संस्थेमध्ये संशोधन, सेवा, तंत्रज्ञान आणि उत्पादन यात सुधारणा करण्यासाठी तसेच, संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेऊन आराखडा तयार करण्यासाठी डॉ.रघुनाथ माशेलकर, माजी महासंचालक, वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन (CSIR) यांच्या अध्यक्षतेखाली High Powered Expert Committee दि.०६/०६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जलयुक्त शिवार अभियानांतर्गत येवला (जि.नाशिक)**
**तालुक्यातील नद्यांचे पुनर्जीवन करण्याबाबत**

**(२२) ८५८७९ (१९-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील नारंदी व धामणी या नद्यांवर सिमेंट नाला बांध कार्यक्रम राबविण्याकरिता जलयुक्त शिवार अभियानांतर्गत विविध योजनांचे अभिसरण करुन लोकसहभागाद्वारे राबविण्यात येत असलेला नदी पुनरुज्जीवन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी निधी मिळण्यासाठी नाशिकच्या जिल्हा प्रशासनाने दिनांक १५ मार्च, २०१६ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवाराच्या कामास निधी मिळण्याकरिता दिनांक २६ सप्टेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीने शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच दिनांक २२ जुलै, २०१७, ११ नोव्हेंबर, २०१६ व १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास येवला, निफाड व नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील नद्यांचे पुनर्जीवन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी नाशिकच्या जिल्हा प्रशासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब आढळली नाही.

(३) दि.२२ जुलै, २०१६ व दि.१२ मे, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली आहे.

(४) शासनाचे दि.१८ ऑगस्ट, २०१७ चे पत्रान्वये नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत नाला उपचार कामाबरोबरच क्षेत्र उपचाराची कामे प्रस्तावित करून शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी, नाशिक यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या “सेहत” संस्थेच्या अहवालाबाबत**

**(२३) ८५९०६ (११-०८-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारिद्र रेषेखालील नागरिकांना वैद्यकीय सेवेचा लाभ मिळावा यासाठी सुरु करण्यात आलेल्या राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ शहरांच्या तूलनेत मागासलेल्या जिल्ह्यात फक्त १२ टक्के रुग्णालयात राबविण्यात येत असल्याचे 'सेहत' या संस्थेच्या अभ्यासपूर्ण अहवालातून दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, नंदूरबार, उस्मानाबाद, रत्नागिरी, सातारा, सिंधुदूर्ग आणि वाशिम या मागासलेल्या जिल्हयांमध्ये सर्वात कमी रुग्णालयांमध्ये ही योजना उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेअंतर्ग ९७१ वैद्यकीय सेवा देण्याचे नमूद असले तरी खर्चिक कर्करोगाच्या उपचार पध्दत १५ हून अधिक जिल्हयामधील खाजगी रुग्णालयामधून होत नसून तसेच गरजू रुग्णांपर्यत सेवाचा प्रसार व प्रचार अजून पोहोचेला नाही असे अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे नाव बदलून महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना असे नामकरण करण्यात येत असून या योजनेमधील त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-१२-२०१७) :** (१) व (२) होय.

"सेहत" संस्थेने जुलै, २०१२ ते ऑगस्ट, २०१४ या कालावधीसाठी अहवाल सादर केला आहे. या कालावधीत बीड, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जालना, नंदूरबार, उस्मानाबाद, रत्नागिरी, सातारा, सिंधुदूर्ग आणि वाशिम जिल्हयामध्ये ६३ रूग्णालये अंगीकृत असून त्यांची टक्केवारी १३ % आहे.

(३) "सेहत" संस्थेने सादर केलेल्या अहवाल कालावधीत खर्चिक कर्करोगाच्या उपचारासाठी रूग्णालय अंगीकृत नसलेले वाशिम, हिंगोली, नंदुरबार, बीड, बुलडाणा, गडचिरोली, यवतमाळ, उस्मानाबाद, परभणी असे ९ जिल्हे होते.या कालावधीत या ९ जिल्हयातील ४११७ कर्करोग रूग्णांनी जवळच्या जिल्हातील अंगीकृत रूग्णालयात उपचार घेतले आहेत. तसेच सद्यस्थितीत या ९ जिल्हयातील १५१५८ रूग्णांनी जवळच्या जिल्हयातील अंगीकृत रूग्णालयात उपचार घेतले आहेत.

गरजू रूग्णापर्यंत योजनेची माहिती पोहचविण्यासाठी आतापर्यंत अंगीकृत रूग्णालयांनी १३३६९ आरोग्य शिबीरे घेतली असून जळगाव, नंदुरबार, बीड, नाशिक, अकोला, सांगली व मुंबई (घाटकोपर) येथे महा आरोग्य शिबीरे घेतली आहेत. योजनेंतर्गत आजपर्यंत १४७२२८१ शस्त्रक्रिया झाल्या आहेत. रेडीओ, दुरदर्शन, वर्तमानपत्रे, रेल्वे व एस.टी.बस या माध्यमातून प्रचार व प्रसिद्धी करण्यात येत आहे.

(४) व (५) सद्यस्थितीत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील मूळ तरतूदी कायम ठेवून सदर योजना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या नावाने राबविण्यात येत आहे. सदर योजनेची व्याप्ती वाढवून सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबविण्याबाबत प्रशासकीय कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**आदिवासी क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील आदिवासी कुमारी मातांच्या पुर्नवसनाबाबत**

**(२४) ८६६१२ (१६-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील आदिवासी कुमारी मातांच्या पुर्नवसनासाठी शासनाकडून योजना राबविण्यात येत आहेत काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे तसेच शासनाने अद्यापपर्यंत किती लाभार्थींना मदत मिळालेली आहे व कुमारी मातांच्या पाल्यांसाठी कोणती योजना राबविली आहे,

(३) असल्यास, आदिवासी कुमारी मातांसाठी शासनाने कोणती योजना तयार केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१८) :** (१) व (२) आदिवासी क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील आदिवासी कुमारी मातांच्या पुनर्वसनासाठी महिला व बाल विकास विभागाकडून कोणतीही स्वतंत्र योजना राबविण्यात येत नाही.

तथापि, अशा पीडित महिलांच्या पुनर्वसनासाठी महिला व बाल विकास विभागाअंतर्गत १८ जिल्ह्यांत एकूण २० महिला राज्यगृहे, स्वयंसेवी संस्थांमार्फत विनाअनुदानित तत्त्वावर ६ संरक्षणगृहे व ९ आधारगृहे कार्यान्वित आहेत. तसेच त्यांच्या बालकांना शासनाच्या बाल संगोपन योजनेचा लाभ देण्यात येतो.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाकडून घेण्यात येणाऱ्या सरळ सेवा भरती अंतर्गत खुल्या वर्गातील ३०% आरक्षणातील महिला उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर दाखला मिळण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(२५) ८७३५० (१९-०८-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून घेण्यात येणाऱ्या सरळ सेवा भरती अंतर्गत खुल्या वर्गातील ३०% आरक्षणातील महिला उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर दाखला सादर करणे अनिवार्य असल्यामुळे उपआयुक्त महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांचेकडून मुळ कागदपत्रे तपासून संबंधीत विभागाकडे सादर करण्यास विलंब होत असल्यामुळे उमेदवारांवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॉन क्रिमीलेअर दाखला वेळेत न दाखल झाल्याने अशा उमेदवारांना नोकरीमध्ये सामावून घेण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनस्तरावरून तात्काळ नॉन क्रिमीलेअर दाखले उपलब्ध करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१८) :** (१) नाही.

महिला व बाल विकास, शासन निर्णय दिनांक २५.०५.२००१ मध्ये मुद्या क्र.(दोन) प्रमाणपत्र (अ) मधील चारनुसार आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी सदर प्रमाणपत्र हे मार्गदर्शक सूचनांनुसार आहे किंवा नाही, हे तपासावे. सदर प्रमाणपत्राचे पृष्ठयर्थ संबंधित उमेदवाराने शासन निर्णयातील परिशिष्ट-२ मधील अर्जान्वये प्रमाणपत्र मिळविण्याकरीता जी माहिती सादर केलेली असेल, ती माहिती मुळ कागदपत्रांवरुन तसेच आवश्यकता वाटल्यास गृहभेटी देवून माहिती तपासावी व सर्व माहिती योग्य असल्याचे आढळून आल्यास प्रमाणपत्र प्रमाणित करुन संबंधित कार्यालयास परत पाठवावे, असे नमूद आहे. उमेदवाराने तहसिल कार्यालयास सादर केलेली परिशिष्ट-२ च्या अर्जामध्ये नमूद केलेली कागदपत्रे नियुक्ती प्राधिकारी यांच्याकडून आयुक्तालयास विहित मुदतीत सादर केल्यास विलंब होत नाही.

(२) नाही.

आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्याकडून अहवाल एका महिन्याच्या आंत प्राप्त झाला नाही तर संबंधित कार्यालयाने पडताळणीच्या अधीन राहून संबंधित उमेदवारास तात्पुरती नेमणूक द्यावी असे नमूद आहे. त्यामुळे नॉन क्रिमीलेअर दाखला वेळेत न दाखल झाल्याने अशा उमेदवारांना नोकरीमध्ये सामावून घेण्यास विलंब होत आहे असे म्हणता येणार नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात जलसंधारण विभागासोबतच काही खाजगी संस्थांनी कोट्यवधी रुपये खर्च करुनही जलशिवार शिवार योजना यशस्वी न झाल्याबाबत

**(२६) ८७४६७ (१९-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात कृषी, वने, पाटबंधारे, पाणीपुरवठा, जलसंधारण विभागासोबतच काही खाजगी संस्थांनी कोटयवधी रुपये तीन वर्षात खर्च करुनही नियोजना अभावी जलयुक्त शिवार योजना कार्यान्वित झाली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात त्वचादानासाठी दात्यांची संख्या अपुरी असल्याबाबत

**(२७) ८७९६४ (१२-०८-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात त्वचा दान करणाऱ्या दात्यांची संख्या खूपच कमी असल्याचे दिनांक १९ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्वचा दान करण्यासाठी राज्यात जनजागृती करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-१२-२०१७) :** (१) व (२) होय.

(३) राज्यात सन २०१६ व सन २०१७ या वर्षात महाअवयवदान अभियान राबविण्यात आले असून त्यामध्ये त्वचादान करण्याबाबतही जनजागृती करण्यात आलेली आहे.सद्यस्थितीत राज्यात खालील ४ केंद्राना त्वचा प्रत्यारोपणासाठी नोंदणीकृत करण्यांत आले आहे :-

१) एलटीएमजी रूग्णालय, सायन, मुंबई
२) टाटा मेमोरियल हॉस्पीटल, मुंबई
३) नॅशनल बर्न सेंटर मुलुंड, मुंबई
४) मसिना हॉस्पीटल, भायखळा, मुंबई

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पेढी व सुर्यगंगा नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करणेबाबत

**(२८) ८८०६३ (११-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पेढी व सुर्यगंगा नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करणेबाबत मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी, तिवसा-भातकुली यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शेंदुरजना बाजार ता.तिवसा येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सूर्यगंगा नदीचे २ कि.मी.लांबीचे खोलीकरण व रूदीकरण तसेच १ सिमेंट बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. या व्यतिरीक्त पेढी नदीपात्राचे खोलीकरण/रूंदीकरणाची अन्य चार कामे प्रस्तावित असून त्यापैकी मौजा देवरा-देवरी येथील नदी पात्राचे २ कि.मी. खोलीकरण व रूंदीकरणाच्या कामास प्रशासकिय मान्यता देण्यात आली असून काम प्रगतीपथावर आहे.

तसेच शेन्दोळा बु. ता.तिवसा येथे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सूर्यगंगा नदीचे प्रस्तावित ३ कि.मी खोलीकरण व रूंदीकरणासह सिमेंट बंधाऱ्याच्या कामाची अंदाजपत्रके तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे निरुळ गंगाभाई (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथे शासनाने विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याची निविदा मंजूर करण्याबाबत**

**(२९)** ८८०६६ **(१९-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निरुळ गंगाभाई (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथे शासनाने विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याची निविदा मंजूर करणेबाबत मा. लोकप्रतिनिधीनी दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती यांना लेखी पत्र दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्राची दखल घेऊन शासनाने त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रचलित अद्ययावत निविदा किंमतीवर ४.९५ टक्के अधीक्याचा प्रस्ताव अस्वीकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये पोषण आहार पुरविणाऱ्या महिला बचत गटांना पैसे न मिळाल्याबाबत**

**(३०)** ८८६४५ **(१६-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये पोषण आहार पुरविणाऱ्या महिला बचत गटांना गेल्या चार महिन्यांपासून पैसे मिळाले नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महिला बचत गटांना पैसे न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या महिला बचत गटांचे थकीत पैसे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-१२-२०१७) :** (१) होय.
(२) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ या कालावधीसाठी पोषण आहार पुरवठयाची देयके पारीत करण्यासाठी आवश्यक अनुदान मागणीपेक्षा कमी प्राप्त झाल्यामुळे बचतगटांना पैसे देण्यात आलेले नाहीत.
(३) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनुदानातून माहे मार्च २०१७ पर्यंतची देयके अदा करण्यात आली असून एप्रिल, २०१७ ची देयके अदा करण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे सेलु व पोळाची वाडी (ता.गेवराई, जि.बीड) येथील जलयुक्त शिवार व लघु जलसंधारण योजने अंतर्गत सिमेंट नाला बंधाऱ्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३१) ८८७१३ (१९-०८-२०१७). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सेलु व पोळाची वाडी (ता.गेवराई, जि.बीड) येथील जलयुक्त शिवार व लघु जलसंधारण योजनेअंतर्गत सिमेंट नाला बंधा-याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून त्यात सिमेंटचे प्रमाण कमी व डब्बर वापरण्यात आले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथील ग्रामस्थांनी लोकसहभागातून नदी खोलीकरणाचे काम केले असताना खोलीकरणाचेही पैसे संबंधीत ठेकेदारांनी अधिकाऱ्यांशी संगनमत करुन गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची तक्रार संबंधीत उपअभियंता यांचेकडे करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उक्त बंधाऱ्याच्या कामाची व दोषी ठेकेदाराची चौकशी करुन संबंधीत अभियंत्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) मौजे पोळाचीवाडी येथील बंधाऱ्याची तक्रार करण्यात आलेली नाही. तथापि, लोकप्रतिनिधींनी आणि तेथील ग्रामस्थांनी सेलु सिनाबं क्र.१ व २ बाबत तक्रार केली आहे.

(४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रस्तुत कामांची सखोल चौकशी करण्यासाठी सदर प्रकरण जिल्हास्तरीय तांत्रिक समितीकडे देण्यात आले आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच चौकशी अहवालातील निष्कर्षानूसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. चौकशीची कार्यवाही सुरू असल्यामुळे संबंधित ठेकेदारांची बिले अदा करण्यात आलेली नाहीत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगरुळ चवाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषध वितरण प्रकरणाबाबत**

**(३२) ८८९१७ (२१-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगरुळ चवाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना देण्यात येणाऱ्या औषध वितरण गैरव्यवहाराप्रकरणी संबधित दोषींवर त्वरीत कारवाई करणेबाबत मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, निलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) मंगरुळ चवाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथे उपचाराकरिता आलेल्या एका रुग्णास नजरचुकीने मुदतबाह्य औषधाचे वाटप करण्यात आले होते. तथापि, सदर बाब लक्षात आल्यानंतर औषध परत घेण्यात आले असून रुग्णास कोणताही अपाय झालेला नाही.

सदर प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती यांनी संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. सदर घटनेबाबत संबंधीतांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर संबंधित औषध निर्माण अधिकारी यांची एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणामकारक न ठरविता रोखण्याची शिक्षा देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील लघुसिंचन, जलसंधारण विभागांतर्गत सिमेंट नालाबांधाची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(३३) ८९२८० (२८-०८-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील लघुसिंचन, जलसंधारण विभागांतर्गत सन २०१६-१७ मध्ये सिमेंट नालाबांधाची कामे निकृष्ट प्रतीची झालेली असून याबाबत आमसभेत ग्रामस्थांनी उपअभियंताविरुध्द तक्रारी करुन त्यांच्या निलंबनाचा ठरावही एकमताने मंजूर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिमेंट नालाबांधाची कामे जलयुक्त योजनेअंतर्गत मुंदाणे, प्र.ठ. १, २, आडगाव १, २, ३, तरवडे १, २, ३, सावरखेडा १ ता.पारोळा येथे झालेली नसतानाही कंत्राटदारांला देयके अदा करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामांच्या चौकशीचे आदेश असतानाही आर्थिक संगनमताने देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

लघुसिंचन (जलसंधारण), पारोळा उपविभागांतर्गत मुंदाणे प्र.ऊ., आडगाव- २ व ३, सावरखेडा ही सिमेंट नाला बांधाची कामे नियमानूसार झालेली असून सदर कामे झाल्यानंतर देयके अदा करण्यात आलेली आहेत.

मुंदाणे प्र.ऊ.१ व २, आडगाव-१, सावरखेडा-१ ही कामे पारोळा उपविभागांतर्गत करण्यात आलेली नाहीत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंढाळी वनपरिक्षेत्रात (जि.नागपूर) अद्यापही वनपरिक्षेत्र अधिकारी नसल्याबाबत**

**(३४) ८९३४७ (११-०८-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंढाळी वनपरिक्षेत्रास (जि.नागपूर) अद्यापही वनपरिक्षेत्र अधिकारी नेमला नसल्याची माहिती माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे वनक्षेत्रात वन्यप्राण्यांची शिकार व पिण्यासाठी पाणी तसेच लाकूडचोर व वणव्यांचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोंढाळी वनपरिक्षेत्रास तातडीने वनपरिक्षेत्र अधिकारी नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-१२-२०१७) :** (१) नागपूर वनविभागातील कोंढाळी वनपरिक्षेत्रात श्री.हुमणे वनक्षेत्रपाल म्हणून दिनांक २१.०९.२०१६ पासून दि.२४.०१.१७ पर्यंत कार्यरत होते तदनंतर सदर पदाचा अतिरीक्त कार्यभार श्री.एम.डी.मोहिते, वनक्षेत्रपाल कळमेश्वर यांचेकडे सोपविण्यात आला होता. दि.२९.०५.१७ अन्वये वनपरिक्षेत्र अधिकारी, कोंढाळी या पदावर श्री.एफ.ए.आझमी यांची पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आलेली असून ते दिनांक ३१.०५.२०१७ पासून कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

कोंढाळी वनपरिक्षेत्रात वनांचे संरक्षण व वन्यप्राणी संरक्षण संवर्धनाकरीता आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे.

(३) वरिलप्रमाणे वनपरिक्षेत्र अधिकारी कोंढाळी या पदावर वनक्षेत्रपालाची नियमीत पदस्थापना झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यात महात्मा फुले जनआरोग्य योजनेबाबत**
**शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या प्रस्तावाच्या त्रुटीबाबत**

**(३५) ८९६६० (१२-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात महात्मा फुले जनआरोग्य योजनेसाठी दावा करतांना शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या प्रस्तावात खाजगी रुग्णालयांना या योजनेचा लाभ देण्याचा कल असल्याच्या तक्रारी वाढल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, कोल्हापूरातील सीपीआर रुग्णालयातील प्रस्ताव मंजूर न करण्याची कारणे काय आहेत याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा फुले जनआरोग्य ही नवीन योजना संपूर्ण राज्यात राबविण्याबाबत**

**(३६) ८९६७८ (१२-०८-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना माहे सप्टेंबर मध्ये बंद करण्यात येणार असून त्याऐवजी दिनांक २ ऑक्टोबर पासून महात्मा फुले जनआरोग्य ही नवीन योजना संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय दिनांक ७ जून, २०१६ च्या राज्य मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजीव गांधी जीवनदायी योजनेचे नाव बदलून महात्मा फुले जनआरोग्य योजना राबविण्यामागे राज्यशासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील गोरगरीब तसेच सर्वसामान्य जनतेला वैद्यकीय उपचार करण्याबाबत राजीव गांधी जीवनदायी योजना सर्वांना माहित असल्याने ही योजना नव्या नावाने सुरु करण्याबाबत राज्य शासनाच्या भूमिकेबाबत सर्वस्तरातून विरोध होत असल्याने सदरील योजना राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या नावाने सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१७) :** (१) होय.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या स्वरूप व व्याप्तीमध्ये बदल करून सुधारित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबविण्याचा निर्णय दिनांक ०७ जून, २०१६ च्या मंत्रिमंडळ बैठकीत शासनाने घेतला आहे.
(२) थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १२५ व्या पुण्यतिथी वर्षानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी या योजनेला त्यांचे नाव देण्यात आले आहे.
(३) व (४) सुधारित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबविण्याबाबत प्रशासकीय कार्यवाही प्रगतीत आहे. सद्यस्थितीत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील मूळ तरतूदी कायम ठेवून सदर योजना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या नावाने राबविण्यात येत आहे.

---

### धडगाव (जि.नंदूरबार) येथील कुपोषित मुलांना ताजा आहार देण्याऐवजी कंपन्यांकडून तयार केलेला, पाकिट बंद आहार लागू करण्याचा निर्णय

**(३७) ८९९६८ (२१-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धडगाव (जि.नंदूरबार) येथील कुपोषित मुलांना स्थानिक भागातून मिळणा-या, भाज्या आणि धान्यापासून तयार केलेला ताजा आहार देण्याऐवजी कंपन्यांकडून तयार केलेला, पाकिट बंद आहार लागू करण्याचा निर्णय दिनांक ७ जून, २०१७ रोजी शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने, कुपोषित मुलांना, ताजा आहार देण्याऐवजी, पाकिट बंद आहार देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याकरीता, सदरहू कुपोषित मुलांना, सकस व ताजा आहार देण्याबाबत, शासनाची भूमिका काय आहे, व त्यादृष्टीने अद्याप कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-१२-२०१७) :** (१) होय.

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना प्रीमीक्स फुड देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतची निविदा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचेकडून प्रकाशित करण्यात आली आहे.

(२) अंगणवाडीतील लाभार्थ्यांना द्यावयाच्या आहारासाठी National Food Security Act,२०१३ हा कायदा मंजूर करण्यात आला असून केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने Suplementary Nuterition (under the Integrated Child Development Service Scheme) Rules २०१५ व Rules २०१७ लागु केला असून त्यानुसार अंगणवाडीतील लाभार्थ्यांना मायक्रोन्युट्रीयन्ट फोर्टीफाईड आहार देणे आवश्यक आहे. त्यामध्ये Meal व Morning Snacks हे दोन्ही द्यावयाचे असून त्याची अंमलबजावणी करणे राज्यशासनास बंधनकारक आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना मायक्रोन्युट्रीयन्ट फोर्टीफाईड पाककृती पहिल्यांदाच देण्यात येणार आहे. यासाठी युनिसेफ व न्युट्रीशनचे कन्सल्टंट, डॉक्टर, संबंधीत तज्ञ यांनी तसेच क्षेत्रीय अधिकारी यांनी दिलेले मत विचारात घेवून हा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) युनिसेफ व न्युट्रीशनचे कन्सल्टंट, डॉक्टर, संबंधीत तज्ञ यांनी तसेच क्षेत्रीय अधिकारी यांनी सूचविल्यानुसार कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी अंगणवाडीतील लाभार्थ्यांना सकाळी नास्ता व दुपारचे जेवणातील पाककृतीमध्ये ५०० कि.कॅलरीज व १२ ते १५ ग्रॅम प्रथिने तसेच मायक्रोन्युट्रीयंट व्हिटॅमिन चा समावेश राहणार असून संपूर्ण आहाराचे फोर्टीफिकेशन होणार आहे. ह्या पाककृती संपूर्णपणे आरोग्यदृष्टया स्वच्छ वातावरणात तयार करण्यात येणार असून National Food Security Act,२०१३ ची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

अंगणवाडीमध्ये प्रिमिक्स फुड चा पॅकेटमध्ये पुरवठा झाल्यानंतर सदर पॅकेटमधील फुड १० मिनीटे शिजविले जाणार आहे. त्यामुळे सदर अन्न हे ताज्या गरम स्वरुपातच लाभार्थ्यांना खाऊ घातले जाणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गतची गावे दुष्काळमुक्त करण्याच्या आराखडयाबाबत

**(३८) ९०४६७ (११-०८-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०१९ पर्यंत २० हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचा आराखडा शासनाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत किती गांवे आतापर्यंत दुष्काळमुक्त करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर आराखड्यात पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यातील किती गावांचा समावेश आहे ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) “सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९” अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी राज्यात जलयुक्त शिवार अभियान जलसंधारण विभाग दिनांक ५ डिसेंबर, २०१४ चे शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत दरवर्षी ५००० प्रमाणे सन २०१९ पर्यंत २५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

(२) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मधील निवडलेल्या एकूण ११४९३ गावात एकूण ४०३२२७ कामे पूर्ण करण्यात आली असून १९४३८ कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये पुणे विभागात १७२८ गावे, कोकण ३३९, नाशिक १८४१, विदर्भ ४३८५ व मराठवाडा ३२०० गावे निवडण्यात आली आहेत.

---

## पातूर (जि.अकोला) तालुक्यातील नदी नाल्यांवर बांधलेल्या बंधाऱ्यापैकी बहुतांश बंधाऱ्यांना दरवाजे बसविण्यात आले नसल्याबाबत

**(३९) ९०४८४ (११-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पातूर (जि.अकोला) तालुक्यातील विविध गावांच्या जवळील नदी नाल्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधलेल्या बंधाऱ्यापैकी बहुतांश बंधाऱ्यांना दरवाजे बसविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्यांना दरवाजे न बसविल्याने रखडलेल्या सिंचनाला जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०८-०१-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) व (३) पातुर तालुक्यामध्ये लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, अकोला यांचे अंतर्गत ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेचे ४४ व १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेचे ०३ कोल्हापुरी बंधारे असे एकुण ४७ कोल्हापुरी बंधारे आहेत. त्यापैकी ३६ बंधाऱ्यांमध्ये फळया बसविण्यात आलेल्या असून, उर्वरित ०६ नाल्यांना मान्सुनोत्तर प्रवाह नसल्याने व ०५ बंधाऱ्यांना गेट उपलब्ध नसल्याने फळया बसविण्यात आलेल्या नाहीत. त्याशिवाय जिल्हा परिषद, अकोला यांचे अंतर्गत १९ कोल्हापुरी बंधारे असुन, त्यापैकी १३ को. प. बंधारे सुस्थितीत आहेत. उर्वरित ०६ बंधाऱ्यांपैकी नादुरूस्त असलेल्या ०३ बंधाऱ्यांच्या दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. मात्र उर्वरित ०३ को.प. बंधारे जास्त क्षतिग्रस्त असून त्याबाबत लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

अकोला जिल्ह्यात अत्यल्प प्रमाणात पाऊस पडल्याने नदी व नाल्याच्या पाण्याचा प्रवाह नसल्याने परिस्थितीनुसार निर्णय घेण्याबाबतच्या सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर बंधाऱ्यांमध्ये दरवर्षी १५ ऑक्टोबर पूर्वी मान्सुनोत्तर प्रवाहाचा अंदाज घेवून फळ्या टाकण्याचे नियोजन करण्यात येते.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील ४ हॉस्पीटलचा महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेत समावेश करण्याबाबत

**(४०) ९०९२९ (१२-०८-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील ४ हॉस्पीटलचा विशेष बाब म्हणुन महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेत समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१३-१२-२०१७) :** (१) होय.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २ मार्च, २०१७ रोजीचे निवेदन या विभागाच्या अधिनस्त राज्य आरोग्य हमी सोसायटी,वरळी,मुंबई या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) सदर निवेदनामध्ये नमूद देशमुख हॉस्पिटल, इचलकरंजी या रूग्णालयांचा अर्ज राज्य आरोग्य हमी सोसायटी या कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

डॉ.बनकर यांचे श्रद्धा सर्जिकल हॉस्पिटल, इचलकरंजी व डॉ.नाईकवडे यांचे सुशील दत्त हॉस्पीटल प्रा.लि.,इचलकरंजी या दोन रूग्णालयांचा ऑनलाईन अर्ज विहित नमून्यात नसून तो अपूर्ण आहे. याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या दिनांक १७.११.२०१७ च्या पत्रान्वये या रूग्णालयांना कळविण्यात आले आहे.

दिनांक १७.०६.२०१६ रोजी झालेल्या ६७ व्या रूग्णालय अंगीकरण समितीच्या बैठकीमध्ये निरामय हॉस्पिटल, इचलकरंजी या रूग्णालयास महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत करण्यात आले असून सदर रूग्णालय या योजनेंतर्गत कार्यान्वित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शेतकरी शुभमंगल सामुदायिक विवाह योजनेबाबत अनभिज्ञ असल्याबाबत

**(४१) ९१०४५ (१८-०८-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुलीच्या लग्नात हुंडा देण्यासाठी कर्ज काढून उभी केलेली रक्कम फेडता येत नसल्याने अनेक शेतकरी व शेतमजूर आत्महत्या करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासनाने १० ते १२ हजार रुपयांची मदत देणारी शुभमंगल सामुदायिक विवाह नावाची योजना सहा वर्षापूर्वी सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकरी या योजनेबाबत अनभिज्ञ असून या योजनेच्या जाहीरातीसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या योजनेची जनतेस माहिती होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०१-२०१८) :** (१) नाही.
(२) महिला व बाल विकास विभागाच्या दिनांक ३०.०९.२०११ च्या आदेशान्वये शेतकऱ्यांच्या /शेतमजूरांच्या मुलींच्या सामुहिक विवाहासाठी राज्यात शुभमंगल सामुहिक विवाह योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच विभागाच्या दिनांक १५.०२.२०१४ च्या आदेशान्वये सदर योजनेच्या व्याप्तीमध्ये वाढ करुन ही योजना निराधार / परित्यक्त्या आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलींच्या विवाहाकरीता लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत विवाहासाठी प्रती जोडपे रु.१० हजार एवढे अनुदान देण्यात येते. तसेच संबंधित स्वयंसेवी संस्थेस प्रती जोडपे रु.२ हजार एवढे अनुदान विवाहाचे आयोजन व तद्अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी देण्यात येते.
(३) व (४) नाही.
महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या जाहिरात व प्रसिध्दीसाठी सन २०१७-१८ करीता रु.१५.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सदर योजनेचाही समावेश आहे. यासंदर्भात विभागाच्या अन्य योजनेसह शुभमंगल सामुहिक विवाह योजनेची माहिती ऑडिओ, जिंगल, माहिती पुस्तिका याव्दारे तसेच स्थानिक पातळीवरील समुपदेशन केंद्र, महिला बचतगट, महिला मेळावे यामधून वेळोवेळी देण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यात जलयुक्त शिवार या योजनेतील कामांसाठी कृषी विभागाचे अधिकारी ३५ टक्के लाच घेत असल्याबाबत

**(४२) ९१२१४ (१९-०८-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यात जलयुक्त शिवार या योजनेतील कृषी विभागाचे अधिकारी ३५ टक्के लाच घेत असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या योजनेतील संबंधित अधिकारी प्रत्यक्ष संकेतस्थळावर न जाता कार्यालयात बसूनच आराखडा तयार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील पैनगंगा नदीवरील १८ सिमेंट नाला बांधसाठी ४ कोटी ८० लाख रुपयांचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(४३) ९१५६० (१८-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नदी पुर्नजीवन कार्यक्रम अंतर्गत मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मा. लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार पैनगंगा नदीवरील १८ सिमेंट नाला बांधसाठी ४ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सिमेंट नाला बांधाचे अंदाजपत्रक तयार करण्याची यंत्रणा लघुसिंचन जलसंधारण विभागाला निदेश देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्देश असतांना बुलढाणा लघुसिंचन (जलसंधारण) कार्यकारी अभियंता यांनी परस्पर शासनाची पूर्वपरवानगी न घेता पेनटाकळी प्रकल्प यांना सादर करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग यांच्या निष्काळजीपणामुळे ४ कोटी ८० लाख रुपयांचा शासनाचा निधी अखर्चित राहिल्याने शासनाकडे परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणीची चौकशी करुन संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येते आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जलयुक्त शिवार अभियान समिती बुलडाणा यांच्या सूचनेनूसार कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.२ चिखली यांनी पैनगंगा नदीवर सिमेंट नाला बांधाचा प्रस्ताव पाठवलेला आहे.
(४) हे खरे नाही.

शासन पत्र दि.१७/१२/२०१६ नूसार पैनगंगा नदीवरील १८ सिमेंट नाला बांधासाठी रू.४.८० कोटी निधी वितरणास तत्वत: मान्यता देण्यात आली असून कामे पूर्ण होतील त्याप्रमाणे निधी वितरीत करण्यात येणार आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भ सदन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामाची देयके तातडीने अदा करणेबाबत

**(४४) ९१८३० (१८-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ सदन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामांची देयके तातडीने अदा करावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री, यांचेकडे दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे पूर्ण करण्याऱ्या मजूर सहकारी संस्था, नागपूर तसेच सुशिक्षित बेरोजगार संघटना, नागपूर तसेच कॉंट्रॅक्टर असोसिएशन, नागपूर यांनी कर्ज घेवून कामे पूर्ण केली असताना त्यांना कामाची देयके देण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-०१-२०१८) :** (१) होय.
(२) होय, सन २०१६-१७ करीता निधी उपलब्ध न झाल्यामुळे देयके अदा करण्यात आलेली नाहीत.
(३) शासन निर्णय क्र.विविका-२०१४/प्र.क्र.१११/जल-१,दि.१३/०९/२०१७ अन्वये विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमातंर्गत पुर्ण झालेल्या व अपुर्णावस्थेत असलेल्या प्रकल्पांचे प्रलंबित दायित्व विभागाच्या अन्य योजनांमधून पूर्ण करण्याकरीता प्रकल्प वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पिंपळनेर व वन परिक्षेत्रात मळगांव (प्रवासी) डोंगरपाडा, उमरपाडा पैकी बरडीपाडा या गाव शिवारातील वनजमिनीवर असलेल्या सागवानी झाडांची तोड केल्याबाबत

**(४५) ९१९०६ (१६-०८-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यातील (जि.धुळे) पिंपळनेर व वन परिक्षेत्रात मळगांव (प्रवासी) डोंगरपाडा, उमरपाडा पैकी बरडीपाडा या गाव शिवारातील वनजमिनीवर असलेल्या सागवानी झाडांची मोठया प्रमाणावर तोड करण्यात आली आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे येथील शेकडो हेक्टर वनजमिनीवर अतिक्रमण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अतिक्रमणात पिंपळनेर वनक्षेत्रपाल तत्कालीन श्री.घरटे व सहाय्यक उपवनसंरक्षक श्रीमती कुलकर्णी हेच जबाबदार असल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी अशा अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या तक्रारीची दखल घेत शासनाने चौकशी करुन सदर अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-१२-२०१७) :** (१) व (२) साक्री तालुक्यातील (जि.धुळे) पिंपळनेर या वनपरिक्षेत्रात माहे एप्रिल २०१६ ते जुलै २०१६ या कालावधीत मौजे उमरपाडा, उमरपाडा-१, बंधारपाडा व मळगांव येथे साग व इतर प्रजातीचे एकूण १२५६ वृक्षांची तोड झाल्याचे निदर्शनास आले होते. त्यापैकी ८६६ वृक्षाचा माल जप्त करण्यात आला आहे व वन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर अवैध वृक्षतोडीचा उद्देश अतिक्रमण करुन शेती करणे हाच होता. प्रश्नांकित क्षेत्रापैकी एकूण ४०.४५ हे.आर क्षेत्रावर अतिक्रमण करण्यात आले होते. सदर वनक्षेत्रावरील अतिक्रमण तातडीने निष्कासित करुन त्या जागेवर प्रोसोपिस बियाणे टाकण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही, या आशयाची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, मौजे बंधारपाडा येथील १० झोपडयाचे अतिक्रमण काढल्याबाबत आक्षेप दर्शवून अतिक्रमण काढण्यामध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे नमूद करणारी तक्रार मा.डी.एस.अहिरे, वि.स.स. (साक्री) यांनी मा.मंत्री महसूल यांच्याकडे केली होती.
(४) व (५) वन अधिकारी, कर्मचारी यांनी जिल्हा प्रशासन व पोलीस विभाग यांच्यासमवेत अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही ही संरक्षणार्थ केलेली कृती असून त्याबाबत वनकर्मचारी वा अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यात जलयुक्तची कामे मोठ्या प्रमाणावर अपूर्ण असल्याबाबत

**(४६) ९१९३५ (१९-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण १६ हजारपेक्षा जास्त जलयुक्त कामे प्रस्तावित असून त्यातील ७ हजार ८८८ कामेच पूर्ण झाल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंधारण मंत्री यांचेकडे दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकाऱ्यांच्या निष्क्रीयत व गैरव्यवहारामुळेच ५० टक्के पेक्षा जास्त कामे अपूर्ण राहील आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामे पूर्ण करण्याबाबत व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उस्मानाबाद जिल्हयात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१६-१७ मध्ये एकूण १६७९५ कामांपैकी विविध यंत्रणेमार्फत ९८८५ कामे (५८.५० टक्के) पूर्ण करण्यात आली आहेत.
(३) व (४) शासन पत्र दि.१३ सप्टेंबर, २०१७ अन्वये जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये निवडलेल्या गावातील अपूर्ण कामे पूर्ण करण्यास ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

---

**हिंगोली जिल्हयातील जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसोबत वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन थकविल्याबाबत**

**(४७) ९२३१८ (२१-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसोबत वैद्यकीय अधिकाऱ्यांची मागील तीन महिन्यांपासूनचे वेतन थकल्यामुळे सुमारे पाचशे पेक्षा अधिक कर्मचारी व अधिकारी यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील तीन महिन्यांच्या वेतनाचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लेखा विभागाला पाठवला असतांनाही लेखा विभागाने प्रस्ताव घेण्यास तोंडी नकार दिल्यामुळे सदर प्रस्तावाला मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२६-१२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

हिंगोली जिल्हयातील आरोग विभागाच्या कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन दरमहा १ तारखेला PFMS द्वारे कर्मचाऱ्यांच्या थेट खात्यावर जमा केले जाते व कोणत्याही कर्मचाऱ्याचे वेतन थकीत नाही.

वैद्यकीय अधिकारी यांचे वेतन कोषागार कार्यालयामार्फत सेवार्थ प्रणालीद्वारे त्याच्या बँक खात्यावर जमा केले जाते. माहे मे, २०१७ पर्यंत कार्यरत एकूण ४४ पैकी १५ वैद्यकीय अधिकारी यांचे काही प्रशासकीय व तांत्रिक कारणास्तव वेतन अदा करता आले नव्हते.

(२) हे खरे नाही.

(३) हिंगोली जिल्ह्यातील आरोग विभागाच्या वेतन प्रलंबित असलेल्या १५ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी ९ वैद्यकीय अधिकारी यांची कार्यालयीन चौकशी सुरू असल्याने व उर्वरीत ६ वैद्यकीय अधिकारी यांचे सेवार्थ प्रणालीतील तांत्रिक कारणामुळे वेतन अदा करता आले नाही.

सद्यस्थितीत वरील प्रश्न निकाली निघाला असल्याने १५ वैद्यकीय अधिकारी यांचे माहे मे, २०१७ पर्यंतचे वेतन सेवार्थ प्रणालीद्वारे देयके तयार करून त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) १५ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी ९ वैद्यकीय अधिकारी यांची कार्यालयीन चौकशी सुरू असल्याने व उर्वरीत ६ वैद्यकीय अधिकारी यांचे सेवार्थ प्रणालीतील तांत्रिक कारणामुळे वेतन अदा झाले नव्हते.

---

**माण (जि.सातारा) तालुक्यातील जाधववाडी येथील ओढयावरील बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्यांचे काम अतिशय निष्कृष्ट दर्जाचे करण्यात आल्याची तक्रार**

**(४८) ९२५९७ (१९-०८-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण तालुक्यातील (जि.सातारा) जाधववाडी येथील ओढयावरील बांधण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्यांचे काम अतिशय निष्कृष्ट दर्जाचे करण्यात आल्याची तक्रार येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सदरची पहाणी करुन संबधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सदर कामाची त्रयस्थ संस्थेकडून पाहणी करून त्यांनी सुचविलेनूसार संपूर्ण बंधाऱ्यास जॅकेटींग करणेत आली आहे. सदर जॅकेटींगचे काम ठेकेदाराकडून त्यांच्या खर्चाने कोणतेही जादा रक्कम न देता करणेत आलेले आहे. त्यानंतर पुन:श्च त्रयस्थ संस्थेकडून कामाची पाहणी करणेत आली असून त्यांनी कामे चांगले असल्याचा निर्वाळा दिला आहे. सदर काम उत्तम स्थितीत असून बंधाऱ्यात पाणीसाठा झालेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या झालेल्या बैठकीत अंगणवाडी केंद्रावर मुलांना वेळेवर पोषण आहार मिळत नसल्याबाबत**

**(४९) ९३६७२ (२१-०८-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या झालेल्या बैठकीत अंगणवाडी केंद्रावर मुलांना वेळेवर पोषण आहार मिळत नसल्याच्या तक्रारी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्हयात २६ एकात्मिक प्रकल्प अधिकाऱ्यांपैकी २३ अधिका-यांची पदे रिक्त असून आदिवासी भागात विविध योजना व पोषण आहार आरोग्य सेवा यांची अंमलबजावणी होत नसल्याने कुपोषणग्रस्त बालकांची संख्या वाढत असून अनेक बालकांचा कुपोषणाने मृत्युही होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-१२-२०१७) :** (१) नाही.

नाशिक जिल्ह्यातील बिगर आदिवासी क्षेत्रातील लाभार्थ्यांना अमृत आहार योजनेंतर्गत व गरोदर स्तनदा माता यांना अंडी / केळी हया योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली मात्र सदर योजना केवळ आदिवासी क्षेत्रापुरती मर्यादित असल्याने याचा लाभ बिगर आदिवासी क्षेत्रातील लाभार्थ्यांना देता येत नाही.

(२) व (३) नाशिक जिल्हयातील एकूण मंजूर २६ प्रकल्पांपैकी मे, २०१७ अखेर २३ पदे रिक्त होती त्यापैकी दि.१२ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये १५ बालविकास प्रकल्प अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून आज मितीस १६ बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यरत आहेत. तसेच आदिवासी भागातील प्रकल्पांपैकी बागलाण बागलाण-२ व देवळा प्रकल्प वगळता सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी यांची पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच यापैकी रिक्त पदांचा कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला असल्यामुळे पोषण आहार आरोग्य सेवा यांची अंमलबजावणी व कुपोषणग्रस्त बालकांची संख्या कमी होण्याच्या दृष्टने प्रयत्न केले जात आहेत. तसेच बालमृत्यु हे कुपोषणाच्या कारणामुळे होत नसून अन्य विविध कारणांमुळे होत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वनविकास महामंडळ, खामगांव (जि.बुलढाणा) येथील वन कामगारांच्या मागण्याबाबत**

**(५०) ९४८८१ (२४-१०-२०१७). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनविभाग व सामाजिक वनीकरणमधील रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या वन कामगारांची माहीती व सेवा जेष्ठता यादी त्यांना शासन सेवेत कायम करण्याचे दृष्टीने शासनाने मागविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील जवळपास ३०० वन कामगार जे रोजगार हमी योजनेंतर्गत २० ते २५ वर्षापासून काम करीत आहेत त्यांचा या यादीत समावेश नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त कामगारांचा समावेश या यादीत करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-११-२०१७) :** (१), (२), (३) व (४) योजना / योजनेत्तर व रोजगार हमी योजनेंतर्गत काम केलेल्या रोजंदारी वनमजूरांना तसेच पुर्णत: रोजगार हमी योजनेंतर्गत काम करीत असलेल्या रोजंदारी वनमजूरांची माहिती अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांजकडून मागविण्यात आलेली आहे. मागविण्यात आलेली माहिती अद्याप अप्राप्त आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.